नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

दिनांक 22/06/2021 (मंगळवार)
(सायंकाळ)

---

## मांगली येथील फार्महाउसमध्ये खुन करून नगदी रक्कम चोरी केलेल्या गुन्हयाचा 24 तासात उलगडा, 37,20,500 रूपये नगदी रक्कम जप्त
## स्थानिक गुन्हे शाखा व पोलीस स्टेशन कुही यांची संयुक्त कारवाई

दिनांक 20.06.2021 रोजी फिर्यादी ज्ञानेश्वर फुले, रा. पंचशिल नगर नागपूर हे आपले पत्नीसह स्वतःचे मौजा मांगली शेत शिवार ता. कुही येथील फार्महाउसवर येथे गेले असतांना तेथील समोरील रूम मध्ये फरशीवर त्यांचेकडील शेती कामाकरीता नोकर असलेला नरेश दशरथ करूडकर वय 37 वर्षे, रा. फेगड ता. कुही जिल्हा नागपूर याचा मृतदेह दिसुन आला. तसेच आजुबाजुला रक्ताचे डाग व मृतदेहाच्या शरिरावर माशा व किडे फिरतांना दिसुन वास येत असल्याचे दिसुन आल्याने फिर्यादी यांनी सदरची माहिती पोलीस स्टेशन कुही यांना दिली. फिर्यादीचे रिपोर्टवरून पोस्टे कुही येथे अप.क्र. 229/21 कलम 397, 302 भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्हयाचे गांभिर्य ओळखुन मा. पोलीस अधीक्षक श्री. राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अनिल जिट्टावार यांना सदर गुन्हा उघड करून आरोपी अटक करणेकामी तात्काळ घटनास्थळी पथक रवाना करण्याचे आदेश दिले. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तसेच पोस्टे कुही येथील पोलीस स्टॉफ घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळाची पाहणी केल्यानंतर प्रथमदर्शनी असे दिसुन आले की, सदरचा खुन हा फार्महाउसमधील पेटीमध्ये ठेवलेल्या पैशाची चोरी करण्यासाठी केलेला असावा. त्यानुसार मृतकाच्या संपर्कातील व फार्महाउसवर शेतीच्या कामाकरीता जाणाऱ्या लोकांकडे तपासाची चक्रे फिरविण्यात आली. मृतकाच्याच गावातील नामे अविनाश नरूले हा 15 दिवसापुर्वी मृतकासोबतच सदर फार्महाउसवर ट्रॅक्टर चालविण्याचे काम करीत होता. परंतु शेत मालकासोबत त्याचे काही कारणास्तव न पटल्याने अविनाशने तिथे काम करणे बंद केले अशी माहिती मिळाली. यावरून संशयीत नामे अविनाश शंकर नरूले वय 24 वर्षे, धंदा चालक, रा. फेगड ता. कुही जिल्हा नागपूर यास त्याचे मोबाईल क्रमांकावर संपर्क केला असता त्याचा मोबाईल बंद मिळुन आला. तसेच तो घरी हजर नसल्याने त्याच्यावरील संशय आणखीनच बळावला. त्यामुळे अविनाश नरूले यास त्याचे ताईचे घरून ताब्यात घेवुन सदर गुन्हयाबाबत विचारपुस करण्यात आली. परंतु सदर खुन केल्याचे तो मान्य करीत नव्हता. त्यामुळे त्यास विश्वासात घेवुन कौशल्याचा वापर करून सखोल विचारपुस केली असता त्याने सदरचा खुन हा दिनांक 17.06.2021 रोजी रात्री 9 ते 10 वाजताचे सुमारास त्याच्याच गावातील त्याचा मित्र नामे राकेश गणभिड महाजन वय 26 वर्षे धंदा चालक, रा. फेगड ता. कुही जिल्हा नागपूर याचे साथीने मृतक नामे नरेश दशरथ करूडकर याचा तिथे मिळुण आलेल्या काठीने डोक्यावर जबर वार करून तसेच टॉवेलने गळा आवळुन खुन केल्याचे मान्य केले. व खुन केल्यानंतर मागिल खोलीमध्ये ठेवलेल्या पेटीमधील रोख रक्कम चोरून नेल्याची माहिती दिली. त्यानुसार आरोपी नामे राकेश महाजन याचा शोध घेवुन त्यास त्याचे राहते घरातुन ताब्यात घेण्यात आले. व फार्महाउसमधुन चोरून नेलेल्या रक्कमे बाबत राकेश महाजन यास सखोल विचारपुस केली असता 'त्याने फार्महाउस मधुन चोरून आणलेली रक्कम ही आपल्या घरातील माळयावर ठेवलेल्या 02 पेटीमधुन काढुन दिली. आरोपीच्या ताब्यातुन रोख रक्कम एकुण 37,20,500/— रू. व त्याने गुन्हा करते वेळी वापरलेले टिशर्ट व जिन्स पॅन्ट व एक सॅमसंग कंपनीचा साधा मोबाईल असा मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला.

मृतक नरेश करूडकर हा मासिक 8,500/— रू. प्रमाणे ज्ञानेश्वर फुले यांचे फार्महाउसवर शेतकामाकरीता होता. त्याचवेळेस आरोपी अविनाश नरूले हा सुध्दा 15 दिवसापुर्वी तेथे ट्रॅक्टर चालविण्यासाठी कामाला होता. दोघेही सोबतच

फार्महाउसवर राहत होते. परंतु अविनाश यांने ट्रॅक्टर मधील डिझेल चोरल्याने मालकाने त्याला कामावरून काढुन टाकले होते. अविनाश नरूले याला फार्महाउसवर मालकाने 20 ते 30 लाख रूपये लपवुन ठेवले आहे याची माहिती होती. 'रात्री दरम्यान नरेश करूडकर हा शेतात एकटाच असतो जर आपण त्याचा खुन केला तर ते पुर्ण पैसे आपण आणु शकतो.' असा प्लॉन अविनाश व राकेश यांनी मिळुन केला व त्यानुसार रात्रोदरम्यान शेतामध्ये जावुन आरोपींनी मृतकाचा खुन केला व फार्ममध्ये असलेले पैसे पोत्यामध्ये भरून घेवुन गेले. परंतु पोलीस तपासात हे सर्व गोष्टी निष्पन्न झाल्याने आरोपी पोलीसांच्या ताब्यात मिळुण आलेले आहेत. दोन्ही आरोपी पोलीसांच्या अटकेत असुन पुढील तपास श्री. चंद्रकांत मदने ठाणेदार पोस्टे कुही हे करीत आहेत. पोलीसांनी घटनचे गांभीर्य तात्काळ ओळखुन जलद गतीने तपास केल्याने अवघ्या 24 तासाच्या आत चोरीसकट केलेल्या खुनाचा उलघडा करणे शक्य झाले.

सदरची कार्यवाही श्री. राकेश ओला पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण, श्री. राहुल माकणिकर अपर पोलीस अधीक्षक ना.ग्रा,श्री.भिमराव टेळे उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड यांचे मार्गदर्शनात श्री. अनिल जिट्टावार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक, श्री. चंद्रकांत मदने पोलीस निरीक्षक पोस्टे कुही, श्री. कविराज सहा.पोलीस निरीक्षक ठाणेदार वेलतुर, श्री. जितेंद्र वैरागडे सहा.पोलीस निरीक्षक, श्री. जावेद शेख पोलीस उपनिरीक्षक, पोहवा मदन आसतकर, पोशि राधेश्याम कांबळे, अजिज शेख, चालक सहा.फौजदार साहेबराव बहाळे सर्व स्थानिक गुन्हे शाखा ना.ग्रा.,सतिश राठोड सायबर सेल, श्री. कमलेश सोनटक्के सहा. पोलीस निरीक्षक, श्रीमती मांडवले सहा. पोलीस निरीक्षक, श्री. अनिल देरकर पोलीस उपनिरीक्षक, पोहवा नामदेव फुलारी, नापो, शैलेश वडलवार, पोशि संदीप गुट्टे, गिरीधर राठोड, आमेल झाडे, राजेंद्र देशमाने, दिपक ढोले, चालक पोहवा चंद्रकांत सेलुकर सर्व पोस्टे कुही तसेच श्री. नितेश डोर्लीकर सहा. पोलीस निरीक्षक, पोहवा/संजय पाचक, पोशि प्रदिप खिलारे सर्व पोस्टे वेलतुर यांनी संयुक्तीकरित्या पार पाडली.



# वाकी शिवारातील कन्हान पात्रातील
# पाण्यात डूबल्याने 04 युवकांचा मृत्यु

पो. स्टे. खापा अंतर्गत येणाऱ्या मौजा वाकी शिवारातील कन्हान नदी कडे आज दिनांक 22/06/2021 रोजी नागपूर शहरातील राहणारे 1. तेजु प्रदीप पोटपसे, वय 20 वर्ष, रा. पाचपावली नागपूर, 2. तोफीक आशिफ खान, वय 16 वर्ष, रा. शांतीनगर, नागपूर, 3. प्रविण गौरकर, वय 27 वर्ष, 4. आवेश शेख नासीर शेख, वय 17 वर्ष, रा. व्हीएचबी कॉलनी नागपूर, 5. आरिफ अकबर पटेल, वय 16 वर्ष, रा. यादव नगर, जयभिम चौक, नागपूर, 6. शायान रियाज काजी, वय 18 वर्ष, रा. व्हीएचबी कॉलनी नागपूर, 7. पलाश जितेश जोशी, वय 20 वर्ष, रा. नागपूर, 8. विशाल भाईलाल चव्हाण, वय 25 वर्ष, रा. इंदरा नगर, नागपूर असे मिळून वाकी येथे येउन वाकी शिवारातील कन्हान नदीचे पात्रात आंघोळी करीता दुपारी 01.00 वा. सुमारास तौफीक, प्रविण, आवेश शेख, आरीफ पटेल हे नदी पात्रात उतरले. इतर मित्र नदीकाठी थांबले असतांना या चौघांना नदी पात्रात असलेल्या पाण्याचा अंदाज न आल्याने ते नदी पात्रातील पाण्याच्या डोहात बुडाल्याने त्यांचा मृत्यु झाला. स्थानिक भोई लोकांचे मदतीने आवेश शेख याचे प्रेत नदीपात्रातुन बाहेर काढण्यात आले. ईतर मृतकांचा SDRF TEAM च्या मदतीने शोध घेत आहेत.

सदर घटनास्थळी श्री. राकेश ओला पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण, उपविभागीय पोलिस अधिकारी उमरेड विभाग श्री. अशोक सरंबळकर, पोलिस निरीक्षक श्री अजय मानकर व पोलिस स्टेशन खापाचा स्टॉफ हजर होते.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर